महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था
नियामक मंडळ, पुणे यांचे कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
ई-मेलआयडी-regulatoryboard2019@gmail.com दूरध्वनी क्रमांक-०२०- २६१२२८४६/४७

जा.क्र.पतसंस्था/सआ-५/नियामक मंडळ/एनपीए तरतूद/सन २०२० दिनांक :- १/१०/२०२०

## परिपत्रक

विषय :- सहकारी पतसंस्थांनी अडचणीत आलेल्या नागरी सहकारी बँकांमध्ये व बँके व्यतिरिक्त अन्य वित्तीय संस्थांमध्ये केलेल्या अनुत्पादक गुंतवणुकीवर करावयाच्या एनपीए तरतूदीबाबत.

संदर्भ :- १. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दि.२५/११/२०१९ रोजीचे परिपत्रक.
२. महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांच्या दि.२४/०९/२०२० रोजीच्या समिती सभेतील निर्णय.

राज्यातील सहकारी पतसंस्थांकरिता दि.१०/११/२००४ च्या परिपत्रकान्वये, अनुत्पादक जिंदगीचे (एनपीए) निकष लागू करण्यात आलेले असून त्यानुसार उत्पन्न संकल्पना, अनुत्पादक जिंदगी वर्गीकरण व तरतुदी याबाबतचे निकष निश्चित केलेले आहेत. सदरचे निकष हे केवळ कर्जासाठी लागू नसून सर्व प्रकारच्या अनुत्पादक जिंदगीसाठी सुध्दा लागू केलेले आहेत.

संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये, पंजाब अँण्ड महाराष्ट्र को-ऑप.बँक लि.मुंबई या बँकेतील राज्यातील पतसंस्थांनी गुंतविलेल्या ठेवी व त्यावरील व्याज मिळण्यास अडचणी निर्माण झाल्याने, सदर बँकेतील गुंतवणुकीचे अनुषंगाने, दि.३१/०३/२०२० रोजी कराव्या लागणा-या तरतुदीचे प्रमाण २०% प्रतिवर्षी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

राज्यातील कांही नागरी सहकारी बँका अडचणीत आल्याने सदर बँकांवर रिझर्व्ह बँकेने, बँकिंग नियमन कायदयामधील तरतूद ३५-अ नुसार कार्यवाही केलेली असल्याने, अशा बँकांमध्ये सहकारी पतसंस्थांनी केलेली गुंतवणूक, अनुत्पादक (एनपीए) जिंदगी मध्ये समाविष्ट झालेली आहे, असे निदर्शनास आलेले आहे.

त्यामुळे, संदर्भ क्र.२ नुसार, राज्यातील आर्थिक अडचणीत आलेल्या व रिझर्व्ह बँकेकडून बँकिंग नियमन कायदा १९४९ चे कलम ३५ (अ) अन्वये कार्यवाही झालेल्या, अशा ज्या बँकांमध्ये राज्यातील सहकारी पतसंस्थांनी केलेली गुंतवणूक अडचणीत आल्याने, सदर गुंतवणूकीपोटी करावयास लागणाऱ्या एनपीए तरतूदीचे प्रमाण प्रतिवर्षी २०% ऐवजी १०% करण्याबाबतचा निर्णय नियामक मंडळाच्या सभेत घेण्यात आलेला आहे.

त्यानुसार,राज्यातील सहकारी पतसंस्थांनी याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

अ. सहकारी पतसंस्थांनी कोणत्याही बँकेमध्ये केलेली गुंतवणूक अनुत्पादक ठरविण्यासाठी सदर बँकेवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडून बँकिंग नियमन कायदा १९४९ मधील कलम ३५- अ नुसार ज्या दिवशी कार्यवाही होईल किंवा झाली असेल त्या दिवसापासून सदर गुंतवणूक ही अनुत्पादक (एनपीए) समजण्यात येईल व एनपीए निकषाच्या प्रचलित कालावधीनुसार सदर गुंतवणूक ही विनातारणी आहे असे गृहीत धरुन त्या आर्थिक वर्षाच्या अखेरीस तरतूद करावी.

आ. सदर अनुत्पादक गुंतवणूकीपोटी कराव्या लागणा-या तरतुदीचे प्रमाण प्रतिवर्षी १०% इतकी, वसूल न झालेल्या व्याजासह मुद्दल रक्कमेवर पुढील १० वर्षापर्यंत प्रतिवर्षी आर्थिक वर्षाच्या अखेरीस होणारी तरतूद विभागून करावी.

इ. ज्या नागरी सहकारी बँकांवर बँकिंग नियमन कायदयाचे कलम ३५ (अ) अन्वये कार्यवाही झालेली आहे अशा बँकांमध्ये सहकारी पतसंस्थांनी केलेल्या गुंतवणूकीपोटी वसूल न झालेल्या व्याजासह मुद्दल रक्कमेवर करावयाची तरतूद ही ज्या दिवसापासून अशी कार्यवाही झाली असेल त्या दिवसाच्या आर्थिक वर्षापासून दिनांक ३१/०३/२०२१ अखेर प्रतिवर्षी १०% प्रमाणे तेवढया कालावधीसाठी तरतूद सहकारी पतसंस्थांनी करावी.

(उदाहरणार्थ- समजा एकाद्या बँकेवर कलम ३५ (अ) अन्वये सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात कार्यवाही झाली असेल तर प्रतिवर्षी १०% प्रमाणे होणारी एनपीए तरतूद दिनांक ३१/०३/२०२१ अखेर तितक्या चार आर्थिक वर्षाच्या कालावधीसाठी ४०% टक्के प्रमाणे होणारी तरतूद सहकारी पतसंस्थांनी करावी.)

ज्या पतसंस्थांनी गुंतवणूकीवरील व्याज उत्पन्न म्हणून नफा - तोटा पत्रकातील उत्पन्न बाजूस घेतले असेल अशा संस्थांनी व्याजाची उत्पन्नात घेतलेली व्याज रक्कम व मुद्दल अशा एकत्रित रकमेवर १० % प्रमाणे प्रतिवर्षी एनपीए तरतूद करावी.

ई. ज्या सहकारी पतसंस्थांनी बँकेव्यतिरिक्त अन्य वित्तीय संस्थेमध्ये गुंतवणूक केलेली असेल अशा गुंतवणूकीच्या बाबतीत प्रचलित एनपीए निकषानुसार ज्या दिवशी सदर गुंतवणूक एनपीए होईल त्या दिवसाच्या असलेल्या आर्थिक वर्षाच्या अखेरीस पासून पुढील १० वर्षात प्रतिवर्षी १०% प्रमाणे तरतूद करावी. ज्या सहकारी पतसंस्थांनी यापुर्वी बँकेव्यतिरिक्त अन्य वित्तीय संस्थांमध्ये केलेल्या अनुत्पादक गुंतवणुकीबाबत वरील "इ" मधील उदाहरणाप्रमाणे तरतूद करावी.

राज्यातील सहकारी पतसंस्थांनी त्यांनी केलेल्या अडचणीतील बँका व अन्य वित्तीय संस्थांमधील गुंतवणूकीबाबत एनपीए तरतुदीबाबत वरील अ.क्र.(अ) ते (ई) प्रमाणे कार्यवाही करावी.

( अनिल कवडे )
अध्यक्ष, नियामक मंडळ
तथा सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति-

१. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२. जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था (सर्व)
३. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरीक्षण) (सर्व)
४. अध्यक्ष, नागरी / ग्रामीण / कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., (सर्व).
५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., मुंबई
सीटीसी क्र.११९/बी, तिसरा मजला, प्रमिला अपार्टमेंट, लकाकी बंगलोशेजारी, लकाकी रोड, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.
६. अध्यक्ष, नागरी / ग्रामीण / कर्मचारी सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन (सर्व).

प्रत माहीतीसाठी-

१. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. अपर निबंधक सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरीक्षण) (सर्व) मुख्यालय, पुणे.
३. मा.प्रधान सचिव (सहकार) , सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई- ३२ (सविनय सादर).